| MHKO020019042020 | **नियमीत दिवाणी दावा क्रं. ६४६/२०२०<br>मधील नि. ३४ खाली आदेश<br><br>अमित भिमराव पाटील वगैरे–२ विरुध्द<br>भगवंतराव शंकरराव माने** |
|---|---|

**०१.** प्रस्तुत दावा वादी यांनी हक्कझापासाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी भगवंतराव शंकरराव माने हे दि. ०६.१२.२००४ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेतले नसल्याने सदर कामी प्रतिवादी यांचे वारसांचे रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला आहे. त्यामुळे झालेला विलंब माफ करावा यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी स्पे.क.नं. २७९/२०२२ या दाव्याच्या कामी वारस रेकॉर्डवर घेणेसाठी मयत प्रतिवादी यांचे वारसांनी दि. १७.०२.२०२५ रोजी अर्ज दाखल ल्यानंतर वादी यांना सदरची बाब समजुन आली. प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस ७ दिवसाचा तांत्रीक विलंब झाला असल्याने सदरचा विलंब माफ करावा अशी विनंती केली आहे. सदर मयत वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक असल्याने झालेला विलंब माफ करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी सदर अर्जास जोरदार हकरत नोंदवली असून वादीच्या सदर अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजू करावा अशी विनंती केली आहे. याउलट मंजूर करावयाचा झाल्यास वादीवर खर्च बसवून मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगी न

दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि दाव्याचा गुणदोषावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. त्यामुळे अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करीत आहे. वादी यांना वारस रेकॉर्डवर घेणेस ७ दिवसाचा विलंब झाला आहे. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश.**

प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला ७ दिवसाचा विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by VINAYA VISHWANATH GIRAM
Date: 2026.02.03 18:00:45 +0530

दि.०२.०२.२०२६.
कोल्हापूर.

(विनया वि.गिराम)
१२ वे सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कोल्हापूर.